**प्रेसनोट** **दिनांकः- १५/०३/२०१९.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.**

**<u>विश्रामबाग पोलीस स्टेशनचे पोलीसांकडुन आई व मुली मधील वाद संपुष्टात.</u>**

दिनांक १४/०३/२०१९ रोजी एक मुलगी,वय-२७ वर्षे,रा.१२६५,सदाशिव पेठ,निंबाळकर तालीम,पुणे हीने विश्रामबाग पोलीस स्टेशन पुणेशहर येथे समक्ष हजर होवून तिची आई यांनी तिचा मोबाईल व सिमकार्ड घेवून निघुन गेलेबाबत व तिचा मोबाईल आणि सिमकार्ड परत मिळवून देण्यासाठी मदत करणेबाबत विनंती केली. सदर वेळी विश्रामबाग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सुनिल कलगुटकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे अंमलदार कर्तव्यावर हजर असलेले पोलीस हवालदार,गोपाळ पवार यांनी सदर मुलीचे सविस्तर म्हणणे ऐकून घेंवून तद्नंतर तिची आई आणि मामा यांचेशी संपर्क साधुन त्यांना पोलीस स्टेशन येथे बोलावून घेवून सदर कुटुंबियांकडे आस्थेने विचारपुस करुन माहिती घेतली असता वर नमुद मुलगी हिचेवर मानसोपचार तज्ञांकडे उपचार चालु असलेबाबत तीचे कुटुंबियांकडुन समजले. सदर वेळी वपोनिरी.सुनिल कलगुटकर व पोलीस ठाणे अंमलदार पोलीस हवालदार,गोपाळ पवार यांनी सदर कुटुंबियांशी सविस्तर चर्चा करुन त्यांची आपसामध्ये समजुत घालून मुलीचा मोबाईल व सिमकार्ड तिला परत मिळवून देवून,त्यांचे कुटुंबियातील झालेले वाद संपुष्टात आणले. पोलसांनी वरीलप्रमाणेच्या कौटुंबिक भांडणामध्ये सामाजिक हित जपुन व त्यांचेतील कौटुंबिक वाद मिटवून मुलीस तीचा मोबाईल व सिमकार्ड परत मिळवून दिल्याने सदर मुलीने पोलीसांचे आभार मानलेले आहे.

(एस.पी.कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.